PUBLICATION – NAVRASHTRA
DATE – OCTOBER 04, 2019
PAGE NO. – 2 (PUNE PLUS)

100% PUBLIC RELATIONS



## भीक देऊन परावलंबी करण्यापेक्षा

# मदत करून स्वावलंबी बनवा

**डॉ. अभिजित सोनावणे यांचे मत**

**पुणे :** आयुष्यात कोणालाही भीक देऊ नका, पण मदत मात्र नक्की करा. भीक देणे म्हणजे समोरच्याला आपल्यावर अवलंबून करणे आणि मदत करणे म्हणजे स्वावलंबी बनविणे. भिकारी वाढतात, किंवा भिक मागतात याला भिक देणारेच उपाय करू शकतात. भिक देणे बंद केले तरच ते पोटापाण्यासाठी पर्याय शोधतील. म्हणूनच भिक देऊन परावलंबी करण्यापेक्षा मदत करून स्वावलंबी बनवा,"असे आवाहन सोहम ट्रस्टचे डॉ. अभिजित सोनावणे यांनी केले.

### भिकाऱ्यांना भीक मागण्यापासून परावृत्त करावे

हिंदू महिला सभेच्यावतीने आयोजित नवरात्र उत्सवात यंदाच्या तिसऱ्या 'दुर्गा पुरस्कारा'ने स्मशानात जळणाऱ्या चितेच्या प्रकाशात अभ्यास करून दहावीत घवघवीत यश पटकाविणाऱ्या पूजा घनसरवाड यांचा गौरव करण्यात आला. हा पुरस्कार सोनावणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह व रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी हिंदू महिला सभेच्या अध्यक्षा सुप्रिया दामले, सोनावणे यांच्या पत्नी डॉ. मनीषा सोनावणे, गुरुनाथ ट्रॅव्हलच्या रोहिणी नामजोशी पांढरे, कथाकथनकार वसुधा मेहंदळे आदि उपस्थित होते. या नवरात्र महोत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यात शहीद जवानांच्या तीन मुलींचे कुमारिका पूजन करण्यात आले. सोनावणे म्हणाले की, माझ्या आई-वडिलांनी खूप कष्टाने शिकवून डॉक्टर केले. त्यामुळे पुढे मार्ग माझा मी शोधायचा ठरवला. गावोगावी जावून पाठी-पोटी, खांद्यावर अशा चार-चार बॅगा घेऊन लोकांचे दरवाजे ठोठावून त्यांना सेवा हवी का म्हणून विचारत.

■ पण लोक विश्वास ठेवत नसत. त्या गावात एका मंदिरात एक भिक्षेकरी बाबा होते त्यांनी मला खूप काही शिकविले. पण ते त्यावेळी समजले नाही. पैसा हेच माझे ध्येय होते. पुढे १४-१५ वर्ष हेच ध्येय ठेऊन जीवतोड मेहनत करून देशाचे प्रतीनिधित्व करायला अमेरिकेलाही गेलो. महिन्याला अडीच लाख रुपये पगार कमावत होतो.

■ पण त्यावेळी मागे वळून पाहताना ते बाबा आठवले. त्यांना वैभव दाखवावे म्हणून त्या गावी गेलो तर ते बाबा हयात नव्हते. मग त्यांनी सांगितलेला 'गेम ऑफ सपोर्ट' आठवला. मी तुला मदत केली तर तू ती मला परत न करत पुढच्याला दे. हाच गेम खेळायचा ठरवून ती नोकरी २०१५ मध्ये सोडली आणि पुन्हा अंगावर चार-चार बॅगा घेऊन या भिक्षेकारुंची सेवा सुरु केली."

■ यात सोनावणे देवाला वाटून दिलेल्या वारांप्रमाणे त्या-त्या मंदिरांबाहेर बसलेल्या भिक्षेकारुंची सुश्रुषा ते करतात. त्यांच्या या कुटुंबात ११०० लोक आहेत असे ते सांगतात. त्यांनी आजवर २०० ते २५० भिक्षेकऱ्याची नेत्र शस्त्रक्रिया केली आहे. १४ मुले भिक मागणे सोडून शिक्षण घेऊ लागली आहेत. सुमारे १५ म्हाताऱ्या भिकाऱ्यांना वृद्धाश्रमात ठेवले.